**महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगास,
(२२३५-ए-३११) या लेखाशिर्षाखालील
सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात निधी
वितरीत करणेबाबत.**

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्र. बाहआ-२०१८/ प्र.क्र.१०८/का-९
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक- १४ मार्च, २०१९

वाचा- १) वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र.पूरक-२०१९/ प्र.क्र.१/ अर्थसंकल्प-३ दि. १८ जानेवारी, २०१९.
२) वित्त विभाग/ अर्थ-७ ची दिनांक २८/०२/२०१९ ची टिप्पणी
३) प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, मुंबई यांचे पत्र क्र. बाहआ-२०१८-१९कार्य.अंदाज/(१८-१९)/४५, दि. २१.०१.२०१९
४) महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्र. बाहआ-२०१८/प्र.क्र.३७ /का-९ दिनांक २८ जानेवारी, २०१९

प्रस्तावना-

महाराष्ट्र बाल हक्क संरक्षण आयोगास सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात मागणी क्र. एक्स-१, २२३५-सामाजिक सुरक्षा व कल्याण,०२-समाजकल्याण,१०२-बालकल्याण (०१)(०५) महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, (२२३५-ए-३११), ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) व ३६ सहाय्यक अनुदाने (वेतन) या लेखाशीर्षाखाली अर्थसंकल्पीत केलेल्या तरतूदीपैकी १००% निधी संदर्भीय क्र.४ येथील शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आलेला आहे.

२. महाराष्ट्र बाल हक्क संरक्षण आयोगाच्या कार्यालयाकरीता फेब्रुवारी, २०१९ च्या अर्थसंकल्पिय अधिवेशनासाठी व्यय अग्रक्रम समितीने मागणी क्र. एक्स-१ मधील या योजनेसाठी २२३५ए३११ लेखाशिर्षाअंतर्गत ३१ उद्दीष्टासाठी एकूण रु. १०.४९ लाख फक्त (रु. दहा लाख एकोणपन्नास हजार फक्त) इतका निधी सन २०१८-१९ च्या सुधारीत अंदाजात उपलब्ध करुन दिलेला आहे. त्यानुसार सुधारित अंदाजानुसार उपलब्ध केलेला रु. १०,४९,०००/- लाख फक्त (रु. दहा लाख एकोणपन्नास हजार फक्त) इतका निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विधाराधीन होती.

शासन निर्णय-

महाराष्ट्र बाल हक्क संरक्षण आयोगास सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात मागणी क्र. एक्स-१, २२३५-सामाजिक सुरक्षा व कल्याण,०२-समाजकल्याण,१०२-बालकल्याण (०१)(०५) महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाची स्थापना (अनिवार्य) (२२३५-ए-३११), लेखाशिर्षामधील ३१ उद्दीष्टासाठी एकूण रु. १०,४९,००० फक्त (रु. दहा लाख एकोणपन्नास हजार फक्त) इतका निधी वितरीत करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२.	महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगास यापूर्वी उक्त लेखाशिर्षाखाली वितरीत केलेल्या संपूर्ण निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करावे, या अटीच्या अधीन राहून सदर निधी खालीलप्रमाणे वितरीत करण्यात येत आहे.

(रुपये हजारात)

लेखाशीर्ष	**उद्दिष्ट**	**सन २०१८-१९ मूळ अर्थसंकल्पीत तरतूद**	**सन २०१८-१९ करीता वितरीत केलेला निधी**	**सुधारीत अंदाज सन २०१८-१९ नुसार उपलब्ध तरतूद**	**सुधारीत अंदाज सन २०१८-१९ नुसार वितरीत करावयाची तरतूद**
१	**२**	**३**	**४**	**५**	**६**
२२३५-ए-३११ (अनिवार्य)	**३१, सहाय्यक अनुदाने (वेतनेतर)**	**१४६८**	**१४६८**	**२५१७**	**१०४९**
	एकूण	**१४६८**	**१४६८**	**२५१७**	**१०४९**

३.	वरील तक्त्यातील स्तंभ क्र.४ येथे दर्शविण्यात आलेला निधी महाराष्ट्र अर्थसंकल्पीय नियमपुस्तिका व वित्तीय अधिकार नियमपुस्तीकेमध्ये उल्लेख केलेल्या तसेच वित्त विभागाच्या दि. ०२ एप्रिल,२०१८ व दि. १२ जानेवारी, २०१९ च्या परिपत्रकात नमूद केलेल्या अटी व शर्तींचे पालन करुन खर्च करण्यात यावा. सदर निधीसाठी नियंत्रक अधिकारी म्हणून आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे हे राहतील.

४.	हा शासन निर्णय, वित्त विभाग परिपत्रक दि.२ एप्रिल,२०१८ चे व दिनांक १२ जानेवारी, २०१९ अन्वये त्या विभागाने दिलेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१९०३१४१७००१३८३३० असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Shrikant Rangrao Waghmode

Digitally signed by Shrikant Rangrao Waghmode
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Woman and Child Development, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=7d6290e8e870a1c46cd16d3903f765faf7b03d01646947b584aa89c266409a04, cn=Shrikant Rangrao Waghmode
Date: 2019.03.14 17:03:05 +05'30'

(श्रीकांत वाघमोडे)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत-

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ / २, मुंबई / नागपूर.
२. महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१ / २, मुंबई / नागपूर.
३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
४. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
५. आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
६. सचिव, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, वरळी, मुंबई.
७. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी (आयुक्तालया मार्फत)
८. कक्ष अधिकारी (व्यय-६ / अर्थसंकल्प-७), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. कक्ष अधिकारी (का-४), महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई, यांना विनंती करण्यात येते की, सदर निधी आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना तात्काळ वितरीत करण्यात यावा.
१०. निवड नस्ती (का-९).